सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभाग
## परिपत्रक

**संदर्भ:** १. मा. शिक्षण संचालनालय, (उ.शि.) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे पत्र जा. क्र. युएनआय/२७६७८/ननियुक्तमान्य/सोवि/विशि-१/१८५६३ दि. ०३/११/२०१८

२. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. सोविसो/शि.मा.-२/२०१८-१९/८८६१ दि. ०९/१०/२०१८

३. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. सोविसो/शि.मा.-२/२०१८-१९/९१६१ दि. १९/१०/२०१८

संदर्भ क्र. १ च्या पत्रातील आदेशान्वये, संदर्भ क्र. २ व संदर्भ क्र. ३ चे दि. २४/१०/१९९२ ते ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त झालेले बिगर नेट/सेट अध्यापकांना स्थाननिश्चितीचे लाभ देण्याबाबतचे या कार्यालयाचे परिपत्रक रद्द करण्यात येत आहे.

सबब, संदर्भ क्र. २ व ३ अन्वये प्राप्त प्रस्ताव व शुल्क महाविद्यालयास परत करण्यात येतील याची कृपया नोंदी घ्यावी.

उपकुलसचिव
शैक्षणिक, संशोधन आणि विकास

जा. क्र. सोविसो/शि.मा.-२/२०१८-१९/ ९८१९
दिनांक : 17 NOV 2018

**प्रति,**
मा. प्राचार्य /संचालक/ संस्थाचालक,
सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालय व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**प्रत:**
१. मा. सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३
२. मा. शिक्षण सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. मा. विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर.
४. वित्त व लेखा विभाग,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in  E-Mail : vishi.dhepune@nci.in

फोन नं.०२०/२६१२२१११, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९  फॅक्स नं.०२०/२६१११११५३.


क्रमांक-युएनआय/२७६७८/ननियुक्तमान्य/सोवि/विशि-१ १८५८३  दिनांक - २६/१०/२०१८

03 NOV 2018

प्रति,

कुलसचिव,
सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर.

**विषय - नव्याने नियुक्त कर्मचा-यांच्या वेतन निश्चितीस मान्यता मिळणेबाबत.**
**सोलापूर विद्यापीठ सोलापूर.**

संदर्भ - सोलापूर विद्यापीठाचेआपल्या विद्यापीठाचे जा.क्र.सोविसो/शि.मा-२/२०१८-१९/९१६१
दि. १९/१०/२०१८.

प्रस्तूत विषयाबाबत संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येत की, आपल्या विद्यापीठाने दि. १९/१०/२०१८ रोजी परिपत्रक निर्गमित केलेले असून सदर परिपत्रकानुसार जे अध्यापक २४.१०.१९९२ ते ०३/०४/२००० कालावधीत नियुक्त झालेले आहेत, सदर कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांना स्थाननिश्चितीचे लाभ देण्याबाबत नमूद केले आहे.

सद्यास्थितीत २४/१०/१९९२ ते ०३/०४/२००० च्या कालावधीत नियुक्त झालेले बिगर नेट/सेट अध्यापकांना स्थाननिश्चितीचे लाभ देण्याबाबतची विशेष अनुमती याचिका १०७५९/२०१३, ७६८५/२०१६ व इतर १५० विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालय येथे प्रलंबित आहेत. असे असून आपल्या विद्यापीठाने दि.१९/१०/२०१८ रोजीचे परिपत्रक निर्गमित केल्याने मा. सर्वोच्च न्यायालय येथे प्रलंबित विशेष अनुमती याचिकावर गंभिर परिणाम होण्याची शक्यता नाकाराता येत नाही तसेच संदर्भीय परिपत्रकानुसार कार्यवाही झाल्यास, शासनातर्फे दाखल असलेल्या विशेष अनुमती याचिका या शासनाच्या विरोधात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**त्यामुळे विषयाचे गांर्भीय लक्षात घेता आपले जा.क्र. सोविसो/शि.मा-२/२०१८-१९/९१६१ दि. १९/१०/२०१८. दि.१९.१०.२०१८ रोजीचे परिपत्रक तात्काळ रद्द करण्यात यावे.**
**(मा.संचाललक (उ.शि) यांनी टिपणी मान्य केली आहे.)**

**(डॉ. मोहन खताळ)**
शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत,

मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३ यांना माहितीस्तव सविनय सादर.

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभाग
## परिपत्रक

**विषय :- दि. २४/१०/१९९२ ते ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट शिक्षकांचे स्थाननिश्चिती प्रस्तावाबाबत ...**

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित महाविद्यालय व मान्यता प्राप्त संस्थेच्या प्राचार्य / संचालक / संस्थाचालक यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) च्या पदाधिकाऱ्यांसमवेत दि. ०३/०९/२०१८ रोजी बैठक संपन्न झालेले असून सदर बैठकीमधील ठरावाच्या अनुषंगाने दि. २४/१०/१९९२ ते ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त झालेल्या बिगर नेट/सेट असलेल्या तदर्थ म्हणून सेवेत कार्यरत असलेल्या सहाय्यक प्राध्यापकांचे स्थाननिश्चितीकरिता प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) अंतर्गत पाचव्या व सहाव्या वेतन आयोगानुसार उक्त कालावधीत नियुक्त झालेल्या सहाय्यक प्राध्यापकांचे खालील आवश्यक कागदपत्रासह आणि सोबत जोडलेल्या तक्त्याचे **सॉफ्ट आणि हार्ड कॉपी** (Times New Roman, Font Size 12, Microsoft Word) मध्ये **दि. ३०/१०/२०१८ पर्यंत** तीन प्रतीत प्रस्ताव शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभागाकडे सादर करावेत. तसेच प्रत्येक शिक्षकांच्या प्रस्तावास रु. १०००/- प्रमाणे शुल्क वित्त व लेखा विभागाकडे रोखीने भरुन, जमा पावती प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य आहे.

जा. क्र. सोविसो/शि.मा.-२/२०१८-१९/ 8861
दिनांक : - 9 OCT 2018

**[प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील]**
विशेष कार्यासन अधिकारी
शैक्षणिक, संशोधन आणि विकास

**प्रति,**
मा. प्राचार्य /संचालक/ संस्थाचालक,
सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालय व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**प्रस्तावासोबत खालील अ. क्र. प्रमाणे जोडावयाचे आवश्यक कागद पत्रे :-**

१. संबंधित शिक्षकांचे शैक्षणिक पात्रता दर्शविणारा तक्ता.
२. जाहिरात व निवड समिती अहवाल.
३. विद्यापीठ मान्यता पत्र.
४. नेमणूक पत्र व रुजू अहवाल.
५. चेंजिस-इन-स्टाफ मान्यता.
६. वेतन निश्चिती प्रमाणपत्र.
७. सेवाखंड क्षमापित केलेला असल्यास विद्यापीठ मान्यता पत्र.
८. उजळणी वर्गाचे प्रमाणपत्र (Refresher Course & Orientation Course.)
९. शैक्षणिक पात्रता.
१०. नेमणूकी नंतर मिळविलेले प्रमाणपत्र (एम.फिल., पीएच.डी, नेट/सेट)

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभाग
## सुधारीत परिपत्रक

**विषय :- दि. २४/१०/१९९२ ते ०३/०४/२००० कालावधीत नियुक्त झालेले बिगर नेट/सेट अध्यापकांना स्थाननिश्चितीचे लाभ देणेबाबत...**
**(सेवेत असताना नेट/ सेट / एम. फिल (११ जुलै, २००९ पूर्वीची) / पीएच.डी प्राप्त अध्यापकांना)**

मा. कुलगुरु महोदयांच्या समवेत सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) च्या पदाधिकाऱ्यांची दि. ०३/०९/२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ४ च्या अनुषंगाने जे अध्यापक दि. २४/१०/१९९२ ते ०३/०४/२००० या कालावधीत बिगर नेट / सेट म्हणून सेवे मध्ये रुजू झालेले आहेत व ज्यांनी दि: १८/१०/२००१ व २७/०६/२०१३ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार सेवा कालावधीमध्ये नेट / सेट / एम.फिल (११ जुलै, २००९ पूर्वीची) / पीएच.डी अर्हता प्राप्त केली आहे त्यांना संबंधित शैक्षणिक पात्रता प्राप्त केल्याच्या दिनांकापासून CAS चे लाभ देण्याची बाब विचारात घेण्यात आली आहे.

याबाबत प्रस्तुत विद्यापीठातील संलग्नित अनुदानित महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्थेच्या प्राचार्य / संचालक/ संस्थाचालक यांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, उक्त कालावधीतील बिगर नेट / सेट प्राध्यापकांना त्यांनी सेवा कालावधीत नेट / सेट /एम.फिल (११ जुलै, २००९ पूर्वीची) / पीएच.डी. अर्हता प्राप्त केली असेल त्या दिनांकापासून CAS चे लाभ देण्यासाठी त्यांचे प्रस्ताव आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह विहित नमून्यात **दि. ०३/११/२०१८ पर्यंत** तीन (सॉफ्ट व हार्ड कॉपी) प्रतीत शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभागाकडे सादर करावेत. तसेच प्रती प्रस्ताव रु. १०००/- प्रमाणे शुल्क वित्त व लेखा विभागाकडे रोखीने भरुन जमा पावती प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

**टिप:-** शैक्षणिक वर्ष सन २००९-१० नंतरच्या वर्षा पासून API मुल्यांकन लागू राहील.

जा. क्र. सोविसो/शि.मा.-२/२०१८-१९/ 9161

दिनांक : 19 OCT 2018

उपकुलसचिव
शैक्षणिक, संशोधन आणि विकास

**प्रति,**
मा. प्राचार्य /संचालक/ संस्थाचालक,
सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालय व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**प्रस्तावासोबत जोडावयाचे आवश्यक कागद पत्रे :-**

१. संबंधित शिक्षकांचे शैक्षणिक पात्रता दर्शविणारा तक्ता - Annexture-I
२. जाहिरात व निवड समिती अहवाल.
३. विद्यापीठ मान्यता पत्र.
४. नेमणूक पत्र व रुजू अहवाल.
५. चेंजिस-इन-स्टाफ मान्यता.
६. वेतन निश्चिती प्रमाणपत्र.
७. सेवाखंड क्षमापित केलेला असल्यास विद्यापीठ मान्यता पत्र.
८. उजळणी वर्गाचे प्रमाणपत्र (Refresher Course & Orientation Course.)
९. शैक्षणिक अर्हतेसंबंधी प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती.
१०. सेवेमध्ये रुजू झालेनंतर प्राप्त केलेल्या शैक्षणिक अर्हतेसंबंधी प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती ( नेट/सेट, एम.फिल., पीएच.डी )